IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# स्थानिक पर्यावरण प्रदूषणाचा मानवी हक्कावर होणारा परिणामांचा शोध

**डॉ. अंकुश जाधव**
सहाय्यक प्राध्यापक, बळवंत कॉलेज, विटा

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 19th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

पर्यावरण,
मानवी हक्क

**ABSTRACT**

मानवाच्या जीवनाचा भोवतालचा परिसर व पर्यावरण हा अविभाज्य भाग आहे. गेल्या काही दशकात मानवाला त्यांच्या भोवतालच्या परिसराची व पर्यावरणाची जाणीव झाली व पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन करणे हा मानवाचा हक्क बनला व त्यातून पर्यावरण संरक्षण हक्क ही संकल्पना पुढे आली. परिसर व पर्यावरण यात बिघाड होण्यामध्ये प्रामुख्याने औद्योगिक व आण्विक क्षेत्रातील वाढता कचरा, वायु व प्राणी प्रदूषणाचे वाढते प्रमाण जंगल तोड व त्यामुळे उपयुक्त व औषधी वनस्पतीचा होणारा विनाश, जमिनीची धूप, भूकंप, पूर, ज्वालामुखी, धरण प्रकल्प व विस्थापितांचे प्रश्न प्राण्यांची शिकार, संगणक, मोबाईलच्या अतिवापराचा मानवी (जीवन) आरोग्यावर होणारा परिणाम याचा समावेश होतो. परिसर व पर्यावरण प्रदूषण हे मानवी जीवनाला धोका निर्माण करतात. पर्यावरण संरक्षणाचा हक्क व मानवाला जीवन जगण्याचा हक्क हे परस्परांवर अवलंबून आहेत. या दोन्ही हक्कांचे रक्षण होणे आवश्यक आहे. स्थानिक पर्यावरण प्रदूषणाचा मानवी हक्कावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेण्याच्या हेतूने प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले आहे.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: Dec 18, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Jadhav, A. (2025). **स्थानिक पर्यावरण प्रदूषणाचा मानवी हक्कावर होणारा परिणामांचा शोध.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), pp. 980–983.

**१ प्रस्तावनाः**

जगाच्या व भारत देशाच्या परिसराचा विचार करता आपले पर्यावरण बदलत आहे व त्यातून अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. पर्यावरण परिस्थितीचा विचार करता जल, हवा, ध्वनी, भू आणि वन्यजीव प्रदूषणाचा प्रश्नअत्यंत गंभीर रूप धारण करत आहे. या पर्यावरण प्रदूषणाचे प्रमुख कारण म्हणजे विज्ञान व तंत्रज्ञानाचा अविचाराने केलेला वापर होय. वाढत्या औद्योगिकीकरणातून निर्माण रासायनिक कचरा, रसायनयुक्त सांडपाणी, कारखाने, व विविध वाहनांच्या धुरातून वातावरणात सोडले क्लुरोफ्लोरो कार्बन, कार्बनडाय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड हे विषारी वायू प्रदूषणाला कारणीभूत ठरतात. सांडपाणी व विषारी द्रव्ये यामुळे नद्या प्रदूषित होऊन मानवी जीवन, जलचर प्राणी, वनस्पती यांचे जीवन धोक्यात येते. मानवी हक्कांच्या संरक्षणाचा विचार करता नैसर्गिक संसाधनाची उपलब्धता स्वच्छ व शुद्ध पर्यावरण उपभोग घेणे हा प्रत्येकाचा नैसर्गिक हक्क आहे. पर्यावरण व त्याचा होत असलेला ऱ्हास व त्यासंबंधीच्या हक्कांची जाणीव प्रत्येक नागरिकाला होणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर पर्यावरण प्रदूषण त्यांची कारणे, मानवी हक्क व पर्यावरण प्रदूषणाचा मानवी हक्कावर कोणता परिणाम होतो, याची पूर्ण माहिती मिळावी या उद्देशाने प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहे.

**समस्येचे विधान :** स्थानिक पर्यावरण प्रदूषणाचा मानवी हक्कावर होणाऱ्या परिणामांचा शोध.

**२ संशोधन पद्धत आणि साहित्य**

**संशोधनाची उदिष्ट्ये:**

१) स्थानिक पर्यावरणाचे घटक निश्चित करणे.

२) स्थानिक पर्यावरण प्रदूषण कारणाचा शोध घेणे.

३) पर्यावरण प्रदूषणाचा स्थानिक लोकांच्या मानवी हक्कावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.

**संशोधनाची गृहीतके:**

१) स्थानिक लोकांना स्थानिक पर्यावरण प्रदूषणाची कारणे माहित असण्याचे प्रमाण अल्प आहे.

२) स्थानिक लोकांना स्थानिक पर्यावरण प्रदूषणाचा स्थानिक लोकांच्या मानवी हक्कावर परिणाम होतो हे माहीत असल्याचे प्रमाण अल्प आहे.

**माहिती स्त्रोत:**

संशोधकानी स्थानिक पर्यावरण निरीक्षणातून, स्थानिक लोकांच्या मुलाखतीतून, पंचायत समिती, जलसिंचन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत, पशुवैद्यकीय केंद्र या विभागांच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या प्रश्नावलीतून मिळालेल्या माहितीवरून स्थानिक पर्यावरण प्रदूषणाचा देखील लोकांच्या हक्कावर कोणता परिणाम झाला याचा शोध घेतला आहे.

**संशोधन कार्यपद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.

**नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी सप्रयोजन (लॉटरी) पद्धतीने नमुना निवड केली आहे.

१) सामाजिक वनीकरण खात्याचे अधिकारी, जलसिंचन विभागाचे अधिकारी, वन अधिकारी पशुवैद्यकीय अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी हे सर्वजण निवडताना ते निवडलेल्या स्थानिक परिसराशी निगडित असणे गरजेचे होते या प्रत्येक खात्याचा मुख्य अधिकारी माहिती मिळवण्यासाठी निवडला गेला.

२) स्थानिक पर्यावरण प्रदूषणाचा शोध घेण्यासाठी स्थानिक लोकांच्या मुलाखती घेणे आवश्यक होते, त्यासाठी सप्रयोजन नमुना निवड पद्धतीने स्थानिक पर्यावरणाची माहिती असणारे प्रत्येक गावातील प्रत्येकी ४० याप्रमाणे १२० लोक निवडले गेले.

**संशोधनाची साधने**

निरीक्षण सूची, मुलाखत सूची, प्रश्नावली इत्यादीचा वापर संशोधनामध्ये केला.

**संशोधनाचे महत्व व गरज**

स्थानिक लोकांना पर्यावरणाची बरीचशी माहिती असते. पर्यावरण प्रदूषणाची कारणे व त्याचा परिणाम आपल्याच मानवी हक्कावर होतो याचा प्रत्येक व्यक्ती विचार करतेच असे नाही. त्यामुळे पर्यावरण संरक्षण, संवर्धन कारणे मानवी हक्क आहे याची जाणीव त्यांना करून देणे आवश्यक आहे. संशोधन निष्कर्षाअंती या प्रत्येक विभागातील अधिकाऱ्यांना, स्थानिक लोकांसाठी सरपंच व ग्रामपंचायत यांना स्थानिक लोकांना त्यांचा नैसर्गिक शुद्ध पर्यावरण हक्क मिळावा व पर्यावरण प्रदूषणावर उपाया बाबत त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी प्रस्तुतचे संशोधन उपयुक्त व महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

१) प्रस्तुत संशोधनात सातारा जिल्ह्यातील सालारा तालुक्यातील शाहूनगर, गोडोली, कोडोली, विलासपुर या गावाच्या परिसरातील स्थानिक पर्यावरणाचा समावेश केला आहे.

२) सदर गावातील प्रत्येकी ४० अशा १२० लोकांकडून माहिती गोळा केली यामध्ये गावचे सरपंच, ग्रामपंचायत, सदस्य इतर जाणकार व्यक्तींचा समावेश केला गेला आहे.

३) सातारा तालुक्यातील पंचायत समिती, जलसिंचन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, अधिकारी सदर गावाशी संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी व प्राथमिक आरोग्य केंद्र अधिकारी यांची माहिती संकलनासाठी समावेश केली गेली आहे.

४) सदर संशोधन २०२४-२०२५ या वर्षापूर्वी मर्यादित आहे.

**३.माहितीचे विश्लेषण अर्थनिर्वचन व निष्कर्ष-**

स्थानिक पर्यावरणाचे घटक व प्रदूषणाचा शोध घेण्यासाठी वापरलेल्या प्रश्नावली, निरीक्षण सूची. मुलाखत सूचीतून मिळालेल्या माहितीचे गुणात्मक विश्लेषण केले आहे.

उदिष्ट्य क्रमांक १-स्थानिक पर्यावरणाचे घटक निश्चित करणे.

निष्कर्ष-संशोधकांनी स्थानिक पर्यावरणाची निरीक्षणातून पर्यावरणाची पुढील घटक निश्चित केले आहेत.

आरोग्य व पर्यावरण, पर्यावरणीय समस्या, पर्यावरण संरक्षण व संवर्धन, जलसंपदा, वनसंपदा प्राणी, संपदा इत्यादी.

उदिष्ट्य क्रमांक २ व ३ नुसार

उदिष्ट्य क्रमांक. २- स्थानिक पर्यावरण प्रदूषण कारणांचा शोध घेणे.

उदिष्ट्य क्रमांक.३-स्थानिक पर्यावरण प्रदूषणाची स्थानिक लोकांच्या मानवी हक्कावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.

निष्कर्ष- गुणात्मक विश्लेषणावरून मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे.

१) जंगलतोड चराईमुळे औषधी वनस्पतीचे व इतर वनस्पतीचे प्रमाण कमी झाले आहे.

२) प्राण्यांच्या शिकारीमुळे प्राणी संपदा प्रमाण अल्प झाली आहे.

३) कारखान्याचे दूषित पाणी, मानवी हस्तक्षेप (जनावरे, वाहने धुणे) कीटकनाशक, रासायनिक खतांचा
अतिवापर, यामुळे पाणी प्रदूषण झाले आहे.

४) पाणी प्रदूषण, सांडपाणी, मूलमूत्र विसर्जनाची असुविधा यामुळे मानवी रोगांचे प्रमाण जास्त आहे.

५) पुराच्या समस्येमुळे पिके नष्ट होऊन आरती नुकसान झाले आहे.

६) शासकीय सुविधा गरजू लोकांपर्यंत पोहोचत नाहीत.

७) अज्ञानामुळे सर्वच लाभार्थी शासकीय सुविधांचा लाभ घेत नाहीत.

८) चुलीच्या धुरामुळे वायू प्रदूषण होते. ९) स्थानिक परिसरातील मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.

१०) व्यसनामुळे (दारू, तंबाखू) मानवी रोगांचे प्रमाण जास्त आहे.

शिफारशी-प्रस्तुत संशोधनातून पुढील शिफारशी केले आहेत.

**ग्रामपंचायतसाठी शिफारशी**

१) सरपंच व ग्रामपंचायतचे सदस्यांनी गावातील लोकांना एकत्र करून ग्रामसभेमध्ये स्थानिक पर्यावरण प्रदूषण कारणांचा गांभीर्याने विचार करून त्यावरील उपाययोजनांची अंमलबजावणी करावी.

२) जलसिंचन विभाग, पशुवैद्यकीय विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, प्राथमिक आरोग्य केंद्र येथील संबंधित अधिकाऱ्यांची मार्गदर्शन मेळावे आयोजित करावेत, स्थानिक पर्यावरणीय समस्या, शासकीय योजना लाभार्थी यांची चर्चा करून उपायांची अंमलबजावणी करावी.

३) पर्यावरण संरक्षण संवर्धन मानवी हक्क याबाबत गावकऱ्यांना तज्ञाची मार्गदर्शन घडवून आणावे.

४) गावकऱ्यांना / लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी सक्ती करावी त्याबाबत मार्गदर्शन करावे.

५) स्थानिक तरुण कार्यकर्त्यावर पर्यावरण रक्षण संवर्धनातून गावकऱ्यांना प्रदूषणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी तज्ञाची व्याख्याने आयोजित करावे व मानवी हक्कांचा लाभ होण्यासाठी सतत कार्यरत राहून आढावा घेण्याची जबाबदारी सोपवावी.

**४ संदर्भसूची-**

1. अहिरराव व अली झाड १९९१ पर्यावरण शिक्षण पुणे निराली प्रकाशन.
2. कुलकर्णी पि.के (२०१३) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय पुणे डायमंड प्रकाशन.
3. Best J.W. (2009) Research in Education Englewood ciftsN.J.Precentice Hall. 24 September 2015 from http:/WWW.unep.org/environmental governance/portal/8/ documents Events/ Human Right Enviornment Rev.pdf